कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २८३ /२०२६ दि. ०९/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक १४/०९/२०२६ ते दिनांक २५/०९/२०२६ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. **दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी) या दिवशी गणपती** विसर्जन होणार आहे. याकरीता सदर कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –

१) गुजरात कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना **गायमुख निरा केंद्राजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

२) घोडबंदर रोडने ठाणे शहराकडे येणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना **गायमुख निरा केंद्राजवळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

३) मुंबई, वसई, विरार कडून घोडबंदर रोडच्या दिशने येणाऱ्या जड अवजड वाहनांना **गायमुख निरा केंद्राजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – गुजरात, मुंबई, विरार वसई कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारी सर्व जड अवजड वाहने ही चिंचोटी नाका – कामण – भिवंडी अंजुर फाटा – मानकोली मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी)** या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मीरा भाईंदर
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर आयुक्तालय वाहतुक विभाग
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण/पालघर/ महामार्ग पोलीस
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मीरा भाईदर
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ ठाणे, वागळे वाहतूक विभाग, पोनि, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्याकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.